**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २५९ । मंगळवार १४ जुलै २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २   https://epaper.dainkaakarshan.com   E-mail- dainikaakarshan@gmail.com   RNI NO. MAHMAR/2021/84322

### मनपा आयुक्तांनी प्रसिद्ध केलेली नोटीस बेकायदेशीर!

# शहरातील वातावरण दूषित करण्याचा आयुक्तांचा प्रयत्न

**समाजवादी पार्टीचा आरोप । जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर शहरात रस्तारुंदीकरणास अडथळा ठरणारे सर्वधर्मीय धार्मिक स्थळे हटविण्यासंदर्भात मनपा आयुक्त यशवंत ड़ांगे यांनी काढलेली नोटीस बेकायदेशीर असल्याचा दावा समाजवादी पार्टीने केला आहे. यासंदर्भात आज, मंगळवारी समाजवादी पार्टीकडून जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले असून, शहरातील वातावरण दूषित करण्याचा हा प्रयत्न असून, जर कुठलाही अनुचित प्रकार घडल्यास त्यास आयुक्त जबाबदार असतील, असा इशारा दिला आहे. ■ पान ४ वर

### शहरातील सर्व दर्गा–मजारी वक्फ अधिनियमानुसार नोंदणीकृत

वास्तविक नगर शहर हे ऐतिहासिक असून शहरातील रस्त्यावरील दर्गा व मजार हे सर्व सुमारे चारशे–पाचशे वर्षापूर्वीचे आहेत. तसेच वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ नुसार नोदंणीकृत आहेत. मागील १० वर्षापूर्वी त्यावेळच्या गहापालिका आयुक्तांनाही शहरातील सर्व दर्गा अधिकृत व नोंदणीकृत असून कोणत्याही प्रकारे अतिक्रमण केलेले नसल्याने त्यावेळची प्रस्तावित कारवाईही रद्द करण्यात यावी, अशी मागणी करून त्यावेळी तत्कालीन आयुकतांना सर्व रेकॉर्ड संबंधित ट्रस्ट व मुस्लिम समाजातर्फे देण्यात आले होते, असे निवेदनात अबिद हुसेन यांनी म्हटले आहे.

### तीव्र धार्मिक प्रतिक्रिया उमटेल, याची जिल्हाधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी

या सर्व विषयी सखोल अभ्यास करुन योग्य तो निर्णय घ्यावा. जर याउपर कोणत्याही प्रकारची बेकायदेशीर कारवाई करण्याच्या प्रयत्न महापालिके तर्फेकरण्यात आला तर समाजवादी पार्टी तसेच शहरातील नागरिकांची तीव्र धार्मिक प्रतिक्रिया उमटल्याशिवाय राहणार नाही, याची गंभीर नोंद घेण्यात यावी, असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

# एलसीबी गुन्हे डिटेक्शनमध्ये बॅकफुटवर

**राज्याचा लौकिकात नगरची पिछेहाट । गुन्हे डिटेक्शनला गती देण्याची गरज**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** एकेकाळी राज्यात नाव लौकिक असलेल्या डिटेक्शनमध्ये नगरची एलसीबी काही प्रमाणात बॅकफुटवर आलेली दिसत आहे. सध्या या विभागाला वाळू, कत्तलखाने आणि फरार आरोपी व्यक्तीरिक्त राज्याचे लक्ष वेधून घेणारे गुन्हे उघडकीस आणण्यात अथवा तपासात बॅफुटवर आली आहे. ड्रग्ज माफिया, श्रीरामपुर सारख्या तालुक्यातील गुन्हेगारी, संगमनेर येथील अल्पवयीन मुलीवरील ॲसिट हल्ला आणि माजी महापौर अभिषेक कळमकर याच्या मुस्क्या आवळण्यात एसीलबीला पुर्णतः निष्प्रभ ठरली आहे. त्यामुळे एलसीबीच्या कार्यक्षमतेवरच प्रश्न चिन्ह निर्माण झाला आहे.

पोलिस अधीक्षकांची अत्यत महत्वाची शाखा म्हणून एलसीबीचा ओळखली जाते. मात्र गेल्या अडीच महिन्यांपुर्वी पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी पदभार घेतल्यावर त्यांनी एलसीबीमध्ये फेरबदल करुन तेथे शेवगावहून संतोष मुटकुळे यांची नियुक्ती केली आहे. मुटकूळे यांनी पदभार घेऊन एक महिन्यांचा कालावधी उलटला असून गेल्या महिन्यात पोलिस अधीक्षक सुदर्शन यांनी पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या जिल्हातर्गत बदल्या केल्या आहेत. एलसबीत कार्यकाळ पुर्ण झालेल्या कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना ■ पान ४ वर

### एलसीबीचा लौकिक पुन्हा वाढविण्यासाठी एसपी, पीआय यांना परिश्रम घ्यावे लागणार



नगर एलसीबीने लक्षवेधी कारवाया करून राज्यात लौकिक मिळविला. परंतु सध्या घडणा–या घटनांमध्ये गंभीर गुन्ह्यांच्या तपासात अपेक्षित प्रगती करण्यात एलसीबी पूर्णतः अपयशी ठरल्याचे चित्र दिसून येत आहे. अडीच महिन्यांपूर्वी रुजू झालेले पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन तसेच महिनाभरापूर्वी एलसीबीची सूत्रे हाती घेतलेले पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांना धाडसी कामांचामोठा अनुभव आहे. त्यामुळे नगरच्या एलसीबीचा लौकिक पुन्हा वाढविण्यासाठीया दोन अधिका–यांना विशेष परिश्रम घ्यावे लागणार आहेत.



### नांगरे,कृष्णप्रकाश सारखा दबदबा निर्माण व्हावा

तत्कालीन पोलिस अधीक्षक विश्वास नांगरे आणि कृष्णप्रकाश यांच्या कार्यकाळत एलसीबीचा राज्यात लौकिक होता. मात्र गेल्या काही दिवसांपासून नगरच्या एलसीबीची पिछेहाट झाली आहे. हे पुन्हा गतवैभव निर्माण करण्यासाठी पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांना एलसीबीकडून राज्यात लौकिकास साजेसे काम करुन घ्यावे लागेल हे मात्र नक्की.

# स्वखर्चाने राज चेंबर्सचा कायापालट विघ्नसंतोषी लोकांना सहन होईना

**प्रत्यक्षात पाहणी करण्याचे व्यावसायिकांनी दिले आव्हान । बाबासाहेब सानप यांनी केलेल्या कचरामुक्तीमुळे समाधानाचे वातावरण**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गेल्या अनेक वर्षांपासून राज चेंबर्समध्ये साचलेला दुर्गधीयुक्त कचरा गाळेधारकांनी स्वखर्चाने काढून या परिसराचा कायापालट केल्याने येथील व्यावसायिकांमध्ये समाधानाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.
मात्र काही विघ्नसंतोषी व्यक्तींना ते सहन होत नसल्याने त्याच्याकडून बेछूट आरोप केले जात असले तरी येथील व्यावसायिकांनी त्या सर्व आरोपांचे खंडन केले आहे.

अनेक वर्षांपासून कोठला येथील राज चेंबर्स येथे दुर्गधीयुक्त कचरा साचला होता. येथील गाळे धारकांनी हा कचरा स्वखर्चाने काढून टाकला. मात्र काही तोतयेगिरी आणि स्टंटबाजी करणाऱ्या विघ्नसंतोषी व्यक्तींनी खोटे तक्रार अर्ज करुन आरोप केले, विविध विभागांत खोट्या तक्रारी केल्या. पण या विघ्नसंतोषी व्यक्तीविरोधात व्यावसायिकांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. तक्रारीची कागदे पाहण्यापेक्षा कोठला येथील राज चेंबर्स येथे येऊन पाहणी करावी असे आव्हान येथील ■ पान ४ वर

### १९९२ नंतर प्रथमच स्वच्छता – अतुल शुक्ला

मी सन १९९२ पासून येथे गाळेधारक आहे. येथे यापूर्वी गांजा पिणारे व्यक्ती वास्तव्य करत होते. परंतु आता येथे स्वच्छता केल्याने येथे पार्किंग आणि येणाऱ्या–जाणाऱ्या व्यक्तींनाही त्याची कुठलीही अडचण नाही. येथील गेटची चावी ही वॉचमनकडे असल्याने त्या वॉचमनला आवाज दिल्यावर तो गेट उघडून देतो. त्यामुळे कुठल्याही गाळेधारकाची अडचण होण्याचा काहीच प्रश्न येत नाही. जो कोणी तक्रारदार असेल त्याला आणि आम्हाला समोरासमोर बसविल्यावर चित्र स्पष्ट होईल.

### सानप साहेबांनी पुढाकार घेतल्याने परिसर अत्यंत स्वच्छ झाला – ॲड. छाया बोरा

बाबासाहेब सानप साहेबांनी पुढकार घेतल्याने गाळे धारकांनी येथील कचरा स्वखर्चाने काढला आहे. येथील परिसत अत्यंत स्वच्छ झाला आहे. येथे २४ तास सुरक्षारक्षक तैनात केल्यामुळे येथे आता कुठलेही भीतीचे वातावरण राहिले नसून आपल्या गाळयांमध्ये आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले असल्याचे ॲड. छाया अशोक बोरा यांनी सागितले.

# सुजय विखेंनी दुध भेसळखोरांना चिथावणी देऊ नये – ॲड. लगड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** ''संपूर्ण महाराष्ट्रात दुध भेसळखोरांना वठणीवर आणण्याचे काम महाराष्ट्र राज्यातील एक कर्तव्यदक्ष अधिकारी तुकाराम मुंढे करत असताना, त्या कामात खो घालण्याचे काम विखेच काय कुठल्याही पुढाऱ्याने करू नये'' अशी मागणी सामाजिक प्रश्नावर सतत आवाज ऊठविणारे जिल्ह्यातील जेष्ठ विधीज्ञ ॲड सुरेश लगड यांनी केली आहे. तुकाराम मुंढे या अधिकाऱ्याच्या कामाला एवढी प्रसिद्धी का यापूर्वीच्या अधिकाऱ्यांनीही काम केलेले आहे.असा प्रश्न विखे यांनी उपस्थित केला आहे. यावर विखेंनी खुलासा करावा. जर यापूर्वी कुठल्याही अधिकाऱ्यांनी तुकाराम मुंढे यांचेसारखे का केले असते तर त्याचा गवगवा झाला असता. व जनतेने पूर्वीच्या अधिकाऱ्यांना त्यांच्या चांगले कामाबद्दल डोक्यावर घेतले असते. परंतु वस्तुस्थिती तशी दिसत नाही. चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्याला शाबासकीची थाप दिली पाहिजे. चांगल्याला चांगले म्हणण्याची दानत ठेवली पाहिजे. संपूर्ण महाराष्ट्रात या ■ पान ४ वर

# श्रीक्षेत्र भगवानगड पायी दिंडी सोहळ्याचे खरवंडी कासार येथे स्वागत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार–** श्री क्षेत्र भगवानगडाचे संस्थापक, ऐश्वर्यसंपन्न श्री संत भगवानबाबा यांनी नारायणगडावर असतानाच मराठवाड्यातून पहिला पायी पालखी सोहळा प्रारंभ केला होता. हीच परंपरा भगवानगडाच्या स्थापनेपासून ते आजतागायत सुरु आहे. श्री क्षेत्र भगवानगडावरुन निघणाऱ्या या पायी पालखी सोहळ्याचे दि .१३ सोमवारी दुपारी ठीक ३ वाजता प्रस्थान झाले. पालखीचे मुक्काम अनुक्रमे भारजवाडी, बावी, खोकरमोह, करंजवन, डिघोळ, जयवंतनगर, कुंबेफळ, आवार पिंपरी, कुर्डुवाडी, ढेकळेवाडी या ठिकाणी होऊन अकराव्या मुक्कामाला पालखी पंढरपूरमध्ये पोहोचते. दरम्यान प्रस्थानापासून ते पंढरपूरमध्ये पोहोचेपर्यंत अनेक दिंड्या भगवानगडाच्या पायी पालखी सोहळ्यामध्ये सहभागी होतात. यामध्ये प्रामुख्याने अंभोरे येथील भोसले महाराजांची दिंडी, गुंजमुर्ती संस्थान, शेषाबाई संस्थान तांबवा, रामगड संस्थान, विठ्ठलगड संस्थान, रामेश्वर संस्थान, भगवानबाबा



संस्थान सुपेसावरगांव, भोगलवाडी संस्थान, राजा हरिश्चंद्र संस्थान, जवळा ग्रामस्थ, बोरकिन्ही ग्रामस्थ, भाग्येश्वर संस्थान तरडगव्हण, गणपतबाबा संस्थान सावरगाव, कुमंडलेश्वर संस्थान घोगस ■ पान ४ वर

# शिर्डीतील १२ नंबर चारी वादावर डॉ. सुजय विखेंचा चुटकीसरशी यशस्वी तोडगा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शिर्डी –** शिर्डीतील पानमळा परिसरातील १२ नंबर चारी प्रकरण गेल्या अनेक दिवसांपासून गाजत असून या परिसरातील काही स्थानिक शेतकरी बांधवांनी चारी पूर्णपणे बंदिस्त करण्यास विरोध करत आंदोलनाचा मार्ग स्वीकारत काम बंद पाडले व त्यानंतर प्रशासनावर रोष व्यक्त केला मात्र यातही दोन गट पडले आणि एका गटाने चारी पूर्णपणे बंदिस्त होण्यास आमचा विरोध नसल्याचे सांगितले तर दुसऱ्या गटाने चारी पूर्ण बंदिस्त करू नये आम्हाला शेतीला पाणीच शिल्लक राहणार नसल्याचे म्हणत तीव्र विरोध दर्शविल्याने प्रशासनापुढे पेच निर्माण झाला व हा वाद टोकाला जाण्याची चिन्हे असताना नेहमीप्रमाणे युवानेते डॉ सुजय विखे पाटील यांनी वादावर तोडगा काढण्यासाठी आज पानमळा परिसरात भेट दिली.

डॉ सुजय विखे पाटील यांचे आगमन होताच रस्त्यात त्यांची वाट पाहत उभे असलेल्या माजी नगरसेवक उत्तम भैय्या कोते यांच्यासह शेतकरी बांधवांनी डॉ सुजय विखे पाटील यांना थांबवत बैठक घेतली व त्यांच्यासमोर आपल्या भावना व्यक्त केल्या त्यानंतर दुसऱ्या बाजूला कोते वस्तीवर चारी पूर्णपणे बंदिस्त होऊ नये यासाठी आग्रही असणाऱ्या विनायक अण्णा कोते,आप्पासाहेब कोते, गंगाभाऊ कोते यांसह नगरसेवक आणि परिसरातील नागरिक आणि विशेषतः महिला भगिनी मोठ्या संख्येने एकत्रित झाल्याचे पाहून डॉ सुजय विखे पाटील यांनी देखील आश्चर्य व्यक्त केले.

यानंतर सुरू झालेल्या बैठकीत डॉ सुजय विखे पाटील यांनी उपस्थितांची एका चारीच्या छोट्या विषयासाठी तुम्हाला आंदोलन करावे लागले आणि माझी तब्येत बरी नसल्याने प्रतीक्षा करावी लागली याबाबत दिलगिरी व्यक्त करत त्यांच्या भावना ऐकून घेतल्या आणि त्यानंतर म्हटले की ना राधाकृष्ण विखे पाटील,मी स्वतः किंवा मुख्याधिकारी, नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष आणि नगरसेवक हे सर्व फक्त पदावर आहेत ते तुमच्या सर्वांमुळे ■ पान ४ वर

# वीर हनुमान वारकरी सेवाभावी प्रतिष्ठानच्या अहिल्यानगर ते पंढरपुर पायी दिंडीचे प्रस्थान

**दिंडी म्हणजे श्रद्धा, भक्ती, आणि समर्पण यांचा संगम – महंत संगमनाथ महाराज**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्राची आध्यात्मिक ओळख म्हणजे विठोबाची वारी. दरवर्षी आषाढी एकादशीला पंढरपूरच्या विठ्ठलाच्या दर्शनासाठी लाखो वारकरी भावभक्तीने चालत जातात. हातात टाळ, गळ्यात भगवे उपरणे, मुखात जय जय रामकृष्ण हरीचा गजर – हा दृष्य पाहताना अंगावर शहारे येतात.ही केवळ यात्रा नाही, हे एक चालतं–जागतं भक्ति संप्रदायाचं जिवंत रूप आहे. ही दिंडी म्हणजे श्रद्धा, भक्ती, आणि समर्पण यांचा संगम आहे. विठोबाशी असलेलं नातं हे केवळ देव–भक्ताचं नातं नाही, तर ते एक प्रेम, जिव्हाळा आणि विश्वासाचं नातं आहे. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, चोखामेळा – या संतांनी या वारीला आत्मा दिला. वारकर्यांची दिंडी म्हणजे चालता बोलता धर्मग्रंथच. दिंडीचे महत्त्व केवळ धार्मिक नाही, तर सामाजिकही आहे. येथे जातीभेद, वर्गभेद, श्रीमंत–गरीब या सीमा नाहीत. इथे सगळे



एकसमान – भक्तिभावाने एकरूप. सहकार, शिस्त, सेवा, आणि साधेपणा हे मूल्य इथे शिकायला मिळतात, असे प्रतिपादन महंत संगमनाथ महाराज यांनी केले.

वीर हनुमान वारकरी सेवाभावी प्रतिष्ठानच्या नगर ते पंढरपुर पायी दिंडी सोहळ्याचे प्रस्थान मार्केट यार्ड येथील हनुमान मंदिर येथून झाले. यावेळी श्री विशाल गणेश मंदिरचे महंत संगमनाथ महाराज, मार्गदर्शक ह.भ.प. बाबासाहेब जाधव, अध्यक्ष दत्ता जाधव ,उपाध्यक्ष नंदु गाडळकर , सचिव झुंबर आव्हाड, खजिनदार मनोज आजबे ,ह.भ.प .संजय महापुरे ,रामदास कानडे ,गोविंद सांगळे ,राजेंद्र कानडे ,विक्रांत राऊत, भिमराज रासकर , यशवंत औटी , छबु गाडळकर, शंकर रासकर आदि उपस्थित होते.

या दिंडी विषयी माहिती देतांना अध्यक्ष दत्ता जाधव म्हणाले, वीर हनुमान पायी ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### वर्धमान तरुण मंडळाकडून संत निवृत्तीनाथ महाराज पालखीचे स्वागत



**अहिल्यानगर - आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूरकडे मार्गस्थ झालेल्या त्र्यंबकेश्वर येथील संत निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्याचे खिस्त गल्ली कारंजा येथील वर्धमान तरुण मंडळाच्या वतीने अत्यंत भक्तिमय वातावरणात व उत्साहात स्वागत करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे यंदाही मंडळाच्या कार्यकर्त्यांनी वारकऱ्यांचे फुलांची उधळण, आकर्षक सजावट आणि आतषबाजीच्या माध्यमातून जल्लोषात स्वागत केले. या स्वागत सोहळ्यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला होता. यावेळी वर्धमान तरुण मंडळाच्या वतीने वारकऱ्यांसाठी अल्पोपहाराचे तसेच थंड पिण्याच्या पाण्याचे वाटप करण्यात आले. पायी चालत आलेल्या हजारो वारकऱ्यांना या सेवेमुळे मोठा दिलासा मिळाला. याशिवाय वारकऱ्यांच्या विविध गरजा लक्षात घेऊन मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सेवाभावाने अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या. वारकऱ्यांची सेवा हीच खरी विठ्ठलभक्ती मानत मंडळाच्या सदस्यांनी अत्यंत समर्पित भावनेने सेवा कार्य पार पाडले. आषाढी एकादशी निमित्त राज्याच्या विविध भागांतून लाखो वारकरी पायी दिंड्यांच्या माध्यमातून विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे प्रस्थान करत आहेत. त्याच पारंपरिक व भक्तिमय सोहळ्याचा भाग म्हणून त्र्यंबकेश्वर येथून निघालेला संत निवृत्तीनाथ महाराजांचा पालखी सोहळा दरवर्षीप्रमाणे अहिल्यानगर शहरातून मार्गक्रमण करत पंढरपूरकडे रवाना झाला. या पालखीचे स्वागत करण्यासाठी खिस्त गल्ली परिसरात भाविक व नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. स्वागतानंतर वारकऱ्यांनी अल्पोपहाराचा लाभ घेतला आणि विठ्ठल नामाचा गजर करत पुन्हा पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण सुरू केले. ''ज्ञानोबा-तुकाराम'' आणि ''पांडुरंग हरी''च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. वारकऱ्यांच्या चेहऱ्यावरील समाधान आणि मंडळाच्या कार्यकर्त्यांचा सेवाभाव यामुळे हा सोहळा अधिकच संस्मरणीय ठरला.वर्धमान तरुण मंडळ हे केवळ धार्मिक कार्यक्रमांपुरते मर्यादित न राहता वर्षभर विविध सामाजिक, शैक्षणिक आणि जनहिताचे उपक्रम राबवत असते. गरजूंना मदत, आरोग्यविषयक उपक्रम, सामाजिक जनजागृती, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम अशा विविध माध्यमांतून मंडळ समाजाप्रती आपली बांधिलकी जपत आहे. समाजसेवा आणि लोकहिताचे कार्य हेच आपले ध्येय मानून मंडळाचे कार्यकर्ते सातत्याने विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत असतात.**

# अहिल्यानगरात श्री संत गंगागिरी महाराज पालखी दिंडीचे भक्तिमय स्वागत

**श्री बालाजी उद्योग ग्रुप व मित्र परिवाराकडून वारकऱ्यांची आरोग्य तपासणी, मोफत औषधोपचार व महाप्रसादाचे वितरण । 'वारकऱ्यांची सेवा हीच पांडुरंगाची सेवा'– वैभव शेटीया**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आषाढी एकादशीनिमित्त सरला बेट येथील श्री संत गंगागिरी महाराज वारकरी पायी पालखी दिंडी सोहळ्याचे अहिल्यानगर शहरात आगमन होताच एमआयडीसी परिसरात श्री बालाजी उद्योग ग्रुप व मित्र परिवाराच्या वतीने दिंडीचे भक्तिभावाने स्वागत करण्यात आले. यावेळी वारकऱ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिर, मोफत औषधोपचार तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. टाळ–मृदुंगाच्या गजरात आणि विठ्ठल नामाच्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला.

यावेळी नगरसेवक बाबूशेठ नागरगोजे, उद्योजक वैभव शेटीया, वैभव सुरवसे, पंचायत समितीचे माजी सदस्य राजेंद्र शेवाळे, योगेश गलांडे, केशव नागरगोजे, विक्रम शेवाळे, अमित बारवकर, डॉ. संजय गडगे, हर्षवर्धन देशपांडे, शुभम बिडवे, अक्षय लोळगे, नरेश शेळके आदींसह उद्योजक, भाविक व वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उद्योजक वैभव शेटीया म्हणाले की, वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राच्या अध्यात्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचा महान वारसा आहे. वारकऱ्यांची सेवा हीच पांडुरंगाची सेवा मानून श्री बालाजी उद्योग ग्रुपच्या वतीने दिंडीतील वारकऱ्यांचे स्वागत करण्यात आले. वारकऱ्यांची आरोग्य तपासणी करून मोफत औषधोपचार करण्यात आले, तसेच सर्व वारकऱ्यांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. धार्मिक व सामाजिक सेवेमुळे समाजात सकारात्मक ऊर्जा आणि प्रेरणा निर्माण होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

नगरसेवक बाबूशेठ नागरगोजे म्हणाले की, महाराष्ट्र ही संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी आहे. संतांनी दिलेले विचार समाजाला दिशा, ऊर्जा आणि प्रेरणा देणारे आहेत. त्यामुळे संतांचा वारसा आणि त्यांचे विचार समाजापर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज आहे. श्री बालाजी उद्योग ग्रुपच्या वतीने यावर्षी प्रथमच वारकऱ्यांच्या सेवेला प्रारंभ करण्यात आला असून, भविष्यातही धार्मिक व अध्यात्मिक कार्यामध्ये अशाच प्रकारे सक्रिय सहभाग घेत समाजसेवेची परंपरा कायम ठेवली जाईल, असे त्यांनी सांगितले.

# डॉन बॉस्को परिसरातील धोकादायक विजेचे खांब, तारांची तातडीने दुरुस्ती करा - डॉ. सागर बोरुडे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सावेडी परिसरातील डॉन बॉस्को भागामध्ये खराब अवस्थेतील विजेचे खांब, झुकलेल्या विद्युत तारा तसेच रस्त्याच्या उंचीमुळे धोकादायकरीत्या खाली आलेल्या वीजवाहिन्यांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून नागरिकांच्या जीवितास मोठा धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर परिसरातील विजेचे खांब व खाली आलेल्या तारांची तातडीने दुरुस्ती करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे यांनी महावितरणचे कार्यकारी अभियंता चव्हाण यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

यावेळी धीरज लोणारे, आदित्य काकडे, रोहिणी अंकुश, सुनंदा हिरवाळे, हेमलता कांबळे, शोभा भिंगारदिवे, सुरेखा फुलपगार, रेश्मा भिंगारदिवे, सुनिता दिवे, सुरेखा बारसे, संगीता अकोलकर, ताराबाई भिंगारदिवे, विमल खरात, पल्लवी खरात आदी नागरिक उपस्थित होते.

डॉ. सागर बोरुडे यांनी सांगितले की, डॉन बॉस्को परिसरातील विजेच्या धोकादायक परिस्थितीबाबत २० मार्च २०२६ रोजी सावेडी विभागाचे सहाय्यक अभियंता यांना लेखी निवेदन देण्यात आले होते. मात्र चार महिन्यांहून अधिक कालावधी उलटूनही महावितरण प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. नागरिकांनी वारंवार तक्रारी व निवेदने देऊनही त्यांची दखल घेतली जात नसल्याची खंत



त्यांनी व्यक्त केली.

ते पुढे म्हणाले की, परिसरातील अनेक विजेचे खांब खराब झाले असून काही खांब झुकलेल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे ते कोणत्याही क्षणी कोसळण्याची भीती नागरिकांमध्ये आहे. तसेच या भागात वेळोवेळी झालेल्या रस्त्यांच्या कामामुळे रस्त्याची उंची वाढली असून त्यामुळे रस्ता आणि विजेच्या तारांमधील सुरक्षित अंतर मोठ्या प्रमाणात कमी झाले आहे. अनेक ठिकाणी विद्युत तारा अत्यंत खाली आल्याने नागरिक, लहान मुले तसेच वाहनचालकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, अनेक ठिकाणी विद्युत तारा एकमेकांच्या संपर्कात येत असून वादळी वाऱ्याच्या वेळी त्या एकमेकांवर आपटून शॉर्टसर्किट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आग लागणे, विजेचा शॉक लागणे किंवा इतर गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# वारकऱ्यांच्या सेवेसाठी सरसावले आयुर्वेद तज्ज्ञ

**धनगरवाडी येथे शिबिराचे आयोजन; गरजूंना ७ दिवसांच्या औषधांचे मोफत वाटप**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्रीक्षेत्र नेवासे येथील संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज मंदिर संस्थान श्री ज्ञानेश्वरी पालखी सोहळा दिंडीसाठी महाराष्ट्र आयुर्वेद संमेलन आणि प्रभा आयुर्वेद फाउंडेशन या संस्थांनी सालाबादप्रमाणे वारकऱ्यांची आयुर्वेदिक पद्धतीने मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन केले आहे. हे शिबीर ७ दिवस चालणार आहे.

संभाजीनगर महामार्गावरील धनगरवाडी येथे या शिबिराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या शिबिराचे उद्घाटन ह.भ.प. देविदास महाराज म्हस्के आणि ह.भ.प. उद्धव महाराज मंडलिक यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरामध्ये गरजू रुग्णांना ७ दिवसांची मोफत आयुर्वेदिक औषधे देण्यात आली. तसेच सांधेदुखी, गुडघेदुखी, पायदुखी, पोटाचे विकार, आम्लपित्त, सर्दी–खोकला आदी श्वसनाचे विकार, पायांच्या जखमा, त्वचा विकार इत्यादी विकारांनी त्रस्त वारकरी रुग्णांना तत्काळ गुण मिळावा आणि वेदना लगेच कमी व्हाव्यात, यासाठी विशिष्ट असे पंचकर्म उपचार देखील करण्यात आले.

यामध्ये स्थानिक स्नेहन, स्वेदन म्हणजेच औषधी तेलाचा मसाज आणि औषधी काढ्याच्या वाफेचा शेक, रक्त मोक्षण, विद्धकर्म, अग्नी कर्म, पादाभ्यंग, व्रण रोपण आदी उपचार करण्यात आले. या सर्व उपचारांचा वेदना कमी होण्यासाठी वारकरी रुग्णांना खूप चांगला उपयोग झाला. रुग्णांनी याविषयीची प्रचिती आल्याचे बोलूनही दाखविले.

या शिबिरात अहिल्यानगर येथील आयुर्वेद तज्ज्ञ, वैद्य महेंद्र शिंदे, वैद्य शरद ठुबे, वैद्य सुरज ठाकुर, वैद्य प्रसाद उबाळे, डॉ. कल्पना ठुबे, वैद्य अंजली शिंदे, वैद्य शुभांगी शिंदे, वैद्य मंजुषा फिरोदिया, वैद्य श्रेया खासगीवाले, वैद्य मैत्रेयी लिमये, वैद्य दत्ता भोंडवे, वैद्य सारिका भोंडवे, वैद्य स्नेहल खराडे, वैद्य शिल्पा पैठणकर, वैद्य केतकी क्षीरसागर, वैद्य आनंद बंग, वैद्य ओंकार पाठक, वैद्य अवधूत गायकवाड, वैद्य गौरी निमसे, वैद्य सायली शिंदे, तसेच येवला, राहुरी, पाचेगाव येथील आयुर्वेद कॉलेजचे विद्यार्थी, राष्ट्रीय आयुर्वेद विद्यापीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. वैद्य सायली महेंद्र शिंदे तसेच महाराष्ट्र आयुर्वेद संमेलन शाखा अहिल्यानगर यांचे पदाधिकारी यांनी हे शिबीर यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. या शिबिराचा ६५० हून अधिक रुग्णांनी लाभ घेतल्याची माहिती आयुर्वेद तज्ज्ञ, वैद्य महेंद्र शिंदे यांनी दिली.

# पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टतर्फे वारकऱ्यांना अल्पोपहाराचे वाटप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आषाढी वारीनिमित्त कल्याण रोड, जिजाऊ नगर, अहिल्यानगर येथून पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या पद्मशाली मार्कंडेय महामुनी दिंडी सोहळा ट्रस्टच्या वारकऱ्यांसाठी पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही पंढरपूरकडे निघालेल्या दिंडीतील वारकऱ्यांचे स्वागत करून त्यांना राजगिरा लाडू, वेफर्स आणि पिण्याच्या पाण्याचे वाटप करण्यात आले. भक्तिमय वातावरणात, विठ्ठल नामाच्या गजरात आणि टाळ–मृदुंगाच्या निनादात हा सेवा उपक्रम पार पडला. वारकऱ्यांनीही ट्रस्टच्या या सेवाभावी उपक्रमाचे कौतुक करत पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

यावेळी पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टचे अध्यक्ष गणेश लक्षेट्टी, सचिव अजयकुमार लयचेट्टी, वरद लक्षेट्टी, श्रावणी लक्षेट्टी तसेच ट्रस्टचे पदाधिकारी, सदस्य आणि सहकार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष गणेश लक्षेट्टी म्हणाले की, 'वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा आत्मा आहे. वारकऱ्यांची सेवा करणे म्हणजे समाजसेवेबरोबरच विठ्ठलाची सेवा करण्याचे भाग्य लाभणे होय. पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्ट स्थापनेपासून विविध सामाजिक, शैक्षणिक व सेवाभावी उपक्रम सातत्याने राबवत आहे. आषाढी वारीच्या निमित्ताने वारकऱ्यांना अल्पोपहाराचे वाटप हा आमचा केवळ कार्यक्रम नसून सामाजिक कर्तव्याचा एक भाग आहे. भविष्यातही समाजहिताचे आणि गरजूंसाठी उपयुक्त ठरणारे विविध उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा आमचा संकल्प आहे.'

पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने दरवर्षी आषाढी वारीदरम्यान वारकऱ्यांसाठी अल्पोपहाराचे आयोजन केले जाते. या उपक्रमामुळे वारकऱ्यांना प्रवासात थोडासा दिलासा मिळत असून ट्रस्टच्या सेवाभावी कार्याची समाजात प्रशंसा होत आहे.

यावर्षीही अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात हा सेवा उपक्रम पार पडला.

# सदगुरू रोहिदासजी प्रतिष्ठानच्या आश्रमशाळेतील अपहारप्रकरणी फरार आरोपींना तात्काळ अटक करा

**पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर घटानाद आंदोलन; खासदार निलेश लंके यांना संसदेत प्रश्न उपस्थित करण्याची मागणी**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील सद्गुरू रोहिदासजी बहुउद्देशीय ग्रामीण विकास प्रतिष्ठान संस्थेमध्ये झालेल्या कथित भ्रष्टाचार व आर्थिक अपहार प्रकरणाची सखोल चौकशी करून फरार आरोपींना तात्काळ अटक करावी, शोषित शिक्षक व कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा तसेच संशयास्पद आर्थिक व्यवहारांची केंद्रीय यंत्रणेमार्फत चौकशी करावी, या प्रमुख मागण्यांसाठी जनहितार्थ जन आक्रोश सोशल असोसिएशन आणि संस्थेतील शोषित शिक्षक–कर्मचाऱ्यांच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर घटानाद आंदोलन व उपोषण करण्यात आले. या आंदोलनाला खासदार निलेश लंके यांनी भेट देत आंदोलकांच्या मागण्या ऐकून घेतल्या.

आंदोलनादरम्यान आंदोलकांनी संस्थेतील कथित आर्थिक गैरव्यवहार, तपासातील विलंब आणि फरार आरोपींना अटक न झाल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. घोषणाबाजी करत संबंधित प्रकरणाचा तपास वेगाने पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली.

आंदोलकांनी खासदार निलेश लंके यांच्यासमोर काही बँक व्यवहारांचे दस्तावेज सादर करत गंभीर आरोप केले. त्यांच्या म्हणण्यानुसार, सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, नवी दिल्ली येथे कार्यरत असलेल्या क्षितीज शर्मा व सौ. भारती शर्मा या अधिकाऱ्याच्या खात्यावर संस्थेच्या खात्यातून तसेच संबंधित व्यवहारांद्वारे एकूण सुमारे ६० लाख ५० हजार रुपये वर्ग करण्यात आल्याचा दावा करण्यात आला. या व्यवहारांचा उद्देश काय होता, संबंधित रकमेचा उपयोग कोणत्या कारणासाठी करण्यात आला आणि या व्यवहारामागील सत्य काय आहे, याची निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी मागणी आंदोलकांनी केली. तसेच हा मुद्दा संसदेत तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून उपस्थित करावा, अशी विनंतीही त्यांनी खासदार लंके यांच्याकडे केली. यावर संबंधित बाबींचा अभ्यास करून योग्य स्तरावर प्रश्न उपस्थित करण्याचे आश्वासन खासदार लंके यांनी दिल्याचे आंदोलकांनी सांगितले.

# माऊली प्रतिष्ठानच्या दिंडीचे स्वागत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पिचडगाव (ता. नेवासा) येथील माऊली प्रतिष्ठानचे महंत ज्ञानेश्वर हजारे महाराज संचलित पायी पंढरपूर दिंडी सोहळ्याचे अहिल्यानगर शहरात आगमन झाले. या दिंडीचे प्रा. विलासराव वाळुंजकर परिवार व संतोष रोडगे परिवार यांच्या वतीने स्वागत करण्यात आले. दिंडीत सहभागी वारक–यांचे अल्पोपाहार देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. याप्रसंगी जवळा गावचे सरपंच बाळासाहेब आखाडे, सरपंच संतोष रोडगे ,श्री. पवार, दीपक वाळुंजकर, प्रदीप वाळुंजकर, हर्षवर्धन वाळुंजकर, श्रेयस वाळुंजकर, कृष्णा वाळुंजकर व नागरिक उपस्थित होते.



## शब्दकोडे क्रमांक : ५

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | ■ | २ | ३ | | ■ | ४ | | ५ | ■ | ६ |
| | ■ | ७ | | | ■ | ८ | | ■ | ९ | १० | |
| ■ | ११ | | | ■ | १२ | ■ | १३ | १४ | ■ | | ■ |
| १५ | | ■ | १६ | १७ | | | ■ | १८ | १९ | ■ | २० |
| ■ | २१ | २२ | ■ | २३ | | ■ | २४ | ■ | २५ | २६ | |
| २७ | ■ | २८ | २९ | ■ | ३० | ३१ | | | ■ | | ■ |
| ३२ | ३३ | ■ | ३४ | ३५ | ■ | ३६ | | ■ | ३७ | | क्ष३९ |
| ■ | ४० | ४१ | ■ | ४२ | ४३ | | ■ | ४३ | | ■ | |
| ४४ | ■ | ४५ | ४६ | | | ■ | ४७ | ■ | ४८ | ४९ | |
| ५० | | ■ | | ■ | ५१ | ५२ | ■ | ५३ | | | ■ |
| | ■ | ५४ | | ५५ | ■ | ५६ | | | ■ | ५७ | ५८ |
| ५९ | | | ■ | ६० | | | ■ | ६१ | | ■ | |

**आडवे शब्द :** १. जिथे आपण शिक्षण घेतो ती वास्तू २. ज्ञान देणारा मार्गदर्शक४. उन्हात झाडाखाली मिळते ती ७. सूर्याचा प्रकाश ८. सध्याचा काळ ९. लाकडापासून बनवलेला ११. जुना झालेला किंवा कोसळलेला १३. पोपट१५. वाईट अवस्था १६. देवाकडून मिळालेला आशीर्वाद १८. निरोप घेताना म्हटला जाणारा शब्द २१. दुधापासून बनवलेला पदार्थ२३. मृत्यू किंवा नाश २५. जागती देखरेख २८. उपमा करण्यासाठी वापरतात ३०. तळहात ३२.इंग्रजीत-धाव ३४.एक आणि पाव मिळून तयार होणारी संख्या ३६. साद ३७.विमानांना मार्ग दाखवणारी प्रणाली ४०.समाजवादी पार्टीचे संक्षिप्त रूप ४२.पहाट ४३.युदध ४५.इंटरनेटच्या युगात बातमी पसरणे ४७.संगीत सप्तकातील एक स्वर ४८.हलवा बनवण्यासाठी वापरतात ५०.वेग ५१.नौका ५३.मुककाम ५४. जे नवीन नाही ते ५६. मध्ये न थांबता येणारे ५८. एक भित्रा प्राणी ५९. पांढरा शुभ्र पक्षी जो पाण्यात मासे पकडतो.६०.मनातली इच्छा ६१.तांबडा **उभे शब्द :** १.पेनमध्ये भरली जाते ती.२. प्रवेश ३.वेळेचा एक छोटा भाग 4.पष्चिम महाराष्ट्रातील एक जिल्हा ५. भगवंताचा चमत्कार ६.प्रवासासाठी वापरले जाणारे वाहन ७.किटक १०.कंबर ११.एक जगप्रसिदध कालवा १२.मन हेलावून टाकणारे १४. हिस्सा किंवा भाग १७.एक विदेशी मदय १९.हिंमत २०.महीन्यांची एकूण संख्या २२.दिन २४.एक पक्षी-पावश्या २६.कोलकात्यातील एक प्रसिदध पूल . . . ब्रिज २७.शूर २९.सुवास ३१.विहीरीतील पाणी काढण्याचे पारंपारीक यंत्र ३३.नाडी ३५.उपयोग ३७.युदधात तोफगोळा डागणारा गाडा ३९.एक लवचिक पदार्थ ४१.बासरी ४३.दैना ४४.आगीचा उसळलेला लोट ४६.एक नदी ४९.सातू ५२.जीवा ५३.हिंदीत-वेडा ५४.एक सारखा दिसणारा ५५.बंगाली बोलीत पैसे ५८.सर्प

### शब्दकोडे क्रमांक : ४ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रू | प | या | ■ | मो | र | ■ | वा | स | ना | ■ | का |
| मा | ड | ■ | का | ल | च | क्र | ■ | फ | स | ग | त |
| ल | व | क | र | ■ | ना | म | दा | र | ■ | ज | र |
| ■ | ळ | ■ | कू | ल | ■ | वा | दा | ■ | नी | र | ■ |
| क | ■ | दा | न | ■ | भा | र | ■ | घे | र | ■ | का |
| लं | ग | र | ■ | ना | क | ■ | सा | ■ | स | ह | ज |
| क | ■ | बा | ग | ■ | री | त | स | र | ■ | म | ळ |
| ■ | जा | न | व | र | ■ | ग | र | ■ | का | ला | ■ |
| घा | ई | ■ | ग | व | का | र | ■ | ग | ळ | ■ | के |
| त | ■ | ह | वा | ■ | य | ■ | स | दा | ■ | दा | व |
| क | द | र | ■ | बा | र | मा | ही | ■ | फा | व | डा |

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### श्रावणात विमानाने वाराणसी अयोध्या प्रयागराज तीर्थयात्रेचे आयोजन



अहिल्यानगर- पवित्र श्रावण महिन्याच्या निमित्ताने वाराणसी, अयोध्या आणि प्रयागराज या हिंदू धर्मातील प्रमुख तीर्थक्षेत्रांच्या दर्शनासाठी १७ ते २० ऑगस्ट २०२६ या कालावधीत विशेष विमान तीर्थयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. अहिल्यानगर येथून विमानाने होणारी ही यात्रा भाविकांना कमी वेळेत अधिकाधिक धार्मिक स्थळांचे दर्शन घडविणारी आणि आरामदायी ठरणार असल्याने यात्रेबाबत मोठी उत्सुकता व्यक्त होत आहे.या यात्रेचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे वाराणसीतील ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व असलेल्या सर्व ८४ घाटांचे बोटीने दर्शन घडविण्यात येणार आहे. याशिवाय काशी विश्वेश्वर मंदिर, कालभैरव मंदिर, प्रयागराज येथील त्रिवेणी संगम, बडे हनुमान मंदिर, अयोध्येतील श्री रामलला मंदिर, हनुमान गढी, कनक भवन, शरयू घाट आदी प्रमुख तीर्थस्थळांचे दर्शनही यात्रेत समाविष्ट करण्यात आले आहे. धार्मिक पर्यटनासोबतच या पवित्र स्थळांचा इतिहास, संस्कृती आणि अध्यात्माचा अनुभव घेण्याची संधी भाविकांना मिळणार आहे. संपूर्ण यात्रा विमान प्रवासाद्वारे होणार असल्याने वेळेची मोठ्या प्रमाणात बचत होणार असून ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच कुटुंबांसाठी ही यात्रा विशेष सोयीची ठरणार आहे. अनुभवी मार्गदर्शक, नियोजनबद्ध दर्शन व्यवस्था आणि सुसूत्र कार्यक्रमामुळे भाविकांना कोणतीही गैरसोय होणार नसून शांत, सुरक्षित आणि समाधानकारक तीर्थयात्रेचा अनुभव मिळणार आहे. या पवित्र यात्रेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या भाविकांनी लवकरात लवकर नोंदणी करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी आणि नोंदणीसाठी अभिजीत पोळ (मो. ९४२२२२७९०६) किंवा नंदकुमार पोळ (मो. ७८७५५०००५६) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### जय जनार्दन स्वामी अनाथ विद्यार्थी आश्रमाच्या दिंडीचे भिंगारमध्ये भक्तीभावाने स्वागत

अहिल्यानगर- आषाढी एकादशीनिमित्त विठुरायाच्या दर्शनासाठी लासलगाव (जि. नाशिक) येथून पंढरपूरकडे निघालेल्या जय जनार्दन स्वामी अनाथ विद्यार्थी व वृद्धाश्रमाच्या पायी दिंडीचे भिंगार येथे भक्तिमय वातावरणात उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. समाजातील वंचित, निराधार आणि अनाथांना मायेचा आधार देत त्यांच्यामध्ये जगण्याची नवी उमेद निर्माण करणाऱ्या आश्रमाच्या कार्याचा गौरव यावेळी करण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते विजय भालसिंग व देवदत्त शेंडे यांच्या पुढाकारातून झालेल्या या स्वागत सोहळ्यात वारकऱ्यांवर पुष्पवृष्टी, सत्कार आणि विठ्ठल नामाच्या अखंड गजराने परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. या दिंडीत आश्रमातील अनाथ विद्यार्थी, वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिक तसेच वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. आश्रमाचे संस्थापक तपस्वी स्वामी वासुदेवनंदगिरी महाराज यांचा विजय भालसिंग यांच्या हस्ते पूजन करून विठ्ठलाची सुंदर मूर्ती भेट देत सन्मान करण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे तसेच महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार प्राप्त डॉ. सुनिल सकट यांच्या हस्ते दिंडी प्रमुख, विणेकरी आणि चोपदार यांचा फेटा बांधून सन्मान करण्यात आला. दिंडी चालक तथा आश्रमाचे सचिव दिलीप गुंजाळ, देवदत्त शेंडे, वारकरी, ग्रामस्थ आणि विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी बोलताना विजय भालसिंग म्हणाले की, पंढरपूरची वारी ही केवळ धार्मिक परंपरा नसून ती समाजसेवा, समता आणि माणुसकीचा संदेश देणारी चळवळ आहे. जय जनार्दन स्वामी आश्रमाने अनाथ बालके आणि निराधार ज्येष्ठ नागरिकांच्या सेवेतून उभे केलेले कार्य अत्यंत प्रेरणादायी आहे. या दिंडीत सहभागी होणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याच्या सेवाभावातून साक्षात विठ्ठलाचे दर्शन घडत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.नाशिक जिल्ह्यातील लासलगाव येथे तपस्वी स्वामी वासुदेवनंदगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली जय जनार्दन स्वामी अनाथ विद्यार्थी आश्रम व वृद्धाश्रम कार्यरत आहे.

---

### टाकळी ढोकेश्वरमध्ये घडले हिंदू - मुस्लिम ऐक्याचे दर्शन

## वै. बबन महाराज पायमोडे यांच्या दिंडीचे दर्ग्यात स्वागत



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** हिंदू - मुस्लिम ऐक्याची परंपरा असणाऱ्या पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथे वै. ह. भ. प. बबन महाराज पायमोडे यांच्या पायी दिंडीचे श्री क्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान होत असताना मुस्लिम बांधवांनी हजरत सुफी इस्माईलशहा बाबा दर्गाह येथे या दिंडीचे उत्साहात स्वागत केले. यावेळी दिंडी रथावर पुष्पवृष्टी करून वारकऱ्यांना अल्पोपहार देण्यात आला. दिंडी चालकांच्या वतीने बाबांच्या दर्ग्यावर चादर अर्पण करण्यात आली.

मुस्लिम जमातचे अध्यक्ष अशपाक हवलदार यांनी सर्वांचे स्वागत केले. आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानचे संस्थापक तथा पत्रकार चाँद शेख यांनी या उपक्रमाचे विवेचन करताना दिंडी पारंपरेतील हिंदू - मुस्लिम ऐक्याची विविध उदाहरणे देत दरवर्षी दिंडी स्वागताची प्रथा जपली जाणार असल्याचे सांगितले.वारकरी व सुफी संप्रदाय यात अनेक समान दुवे असून हे दोन्ही पंथ समानतेची व मानवतेची शिकवण देताना कर्मकांडाला थारा देत नाहीत. या दोन्ही संतांच्या या गळाभेटीने हिंदू - मुस्लिम एकतेचे धागे अधिक घट्ट बांधले गेले असल्याची भावना व्यक्त केली.

यावेळी सरपंच अरुणाताई खिलारी, माजी सरपंच शिवाजी खिलारी, संजय उदावंत, खरेदी विक्री संघाचे माजी चेअरमन बाबासाहेब खिलारी, दिंडी चालक रवींद्र पायमोडे, शंकर रांधवण अशोक झावरे, ग्रा. पं. सदस्य भाऊसाहेब खिलारी, संतोष सोनावळे, संकेत झावरे, मळीभाऊ रांधवण, अंकुश पायमोडे, रावसाहेब झावरे, संदीप खिलारी, शिराजभाई हवलदार, चाँदशेठ इनामदार, बशीरभाई हवलदार, आदमभाई हवलदार, मुजावर उस्मानभाई, राजू शेख, साजिद पटेल, सद्दाम इनामदार, छोटूभाई हवलदार, अल्ताफ शेख, निसार शेख, आमीन पिंजारी, हर्षब मुजावर, रमजान शेख, अफसर शेख, सोहेल हवालदार, निहाल हवालदार, शाहिद शेख,फैजान मोमीन, अब्दुल हवालदार, हाफिजी सुलेमान पटेल आदींसह ग्रामस्थ, वारकरी व मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. आजिजभाई हवलदार यांनी आभार मानले.

**दोन महानुभाव मित्रांची गळाभेट**

वै. ह भ प बबन महाराज पायमोडे व पैगंबरवासी हजरत सुफी इस्माईलशहा बाबा हे लहानपणापासूनचे सवंगडी होते. या उपक्रमाने वारकरी संप्रदाय व सुफी संप्रदायातील या मित्रांची जणू गळाभेटच झाली. यावेळी पावसासाठी हिंदू - मुस्लिम बांधवांनी सामूहिक प्रार्थना केली.

---

## ग्रंथालय वास्तु शिल्पकार संजय मस्के यांनी स्वीकारला जिल्हा ग्रंथालय अधिकारी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** ग्रंथालय ही वर्धिष्णू संस्था आहे. ग्रंथालयातील वाचक सभासद, ग्रंथ संख्या व साधन सामग्री यांच्यात नेहमी वाढ होत असते. अशा ग्रंथालय चळवळीला नवी गती आणि नवी उंची देणारे अधिकारी श्री. संजय मस्के यांनी. नुकताच जिल्हा ग्रंथालय अधिकारी अहिल्यानगर या पदाचा पदभार प्र. जिल्हा ग्रंथालय अधिकारी, रामदास शिंदे यांच्या कडून स्विकारला आहे. श्री. मस्के हे लोकहीत व प्रशासकीय कारणास्तव जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, बीड येथून अहिल्यानगर येथे बदलून आले आहे.

त्यांनी आपल्या सेवेची सुरुवात ग्रंथालय संचालनालय, मुंबई येथे सुरू करून छत्रपती संभाजीनगर, पुणे,जालना, धुळे व बीड इत्यादी ठिकाणी विविध पदावर काम केले आहे. त्यांनी जेथे जेथे काम केले तेथील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय इमारत बांधकामासाठी विशेष पुढाकार घेऊन काम पूर्ण केले आहे. त्यांच्या कार्यकाळात ७ ते ८ कार्यालयांच्या इमारती उभ्या राहिल्या आहेत. म्हणून त्यांना ग्रंथालय संचालनालयातील वास्तु शिल्पकार म्हणून संबोधले जाते. तसेच ग्रंथालयाच्या आधुनिकीकरणासाठी ई-ग्रंथालय सेवा सुरू केली. यामुळे प्रथमच ग्रंथालय हे वाचकांच्या मोबाईल आणि लॅपटॉपवर आले. तंत्रज्ञानाच्या मदतीने वाचन संस्कृती घराघरात पोहोचवण्याचे मोठे काम त्यांनी केले आहे.

जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालयांना पायाभूत सुविधांसाठीही त्यांनी विशेष प्रयत्न केले आहे . याशिवाय राजा राममोहन रॉय लायब्ररी फाउंडेशन, कोलकाता या देशातील सर्वात मोठ्या ग्रंथालय संस्थेकडून त्यांनी अनेक ग्रंथालयांना विविध योजनांच्या माध्यमातून मार्गदर्शन केले आहे. तसेच जिल्ह्यात विविध माध्यमातून ग्रंथालयांना योजनेचा लाभ मिळवून देण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला आहे.

या प्रसंगी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात, अहिल्यानगर च्या वतीने रामदास शिंदे, प्रमोद गिरी,संतोष कापसे, जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने संस्थापक अध्यक्ष सदाशिव शेळके सर व अध्यक्ष सुरेंद्र शिंदे, अहमदनगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने ग्रंथपाल आमोल इथापे, पारनेर तालुका ग्रंथालय संघाच्या वतीने अध्यक्ष विजय डोळ व लक्ष्मण खोडदे आदिनी त्यांचे स्वागत केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहे.

---

## नवी पेठ जैन धर्मस्थानकात पूज्य उपाध्याय प्रवर श्री प्रवीण ऋषीजी महाराज यांचे उत्स्फूर्त स्वागत

**हजारो भाविकांनी घेतला प्रवचनाचा लाभ । जय आनंद महावीर युवक मंडळ व आनंद चालीसा ग्रुपतर्फे स्वागत सोहळा**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरातील नवी पेठ जैन धर्मस्थानक येथे पूज्य उपाध्याय प्रवर श्री प्रवीण ऋषीजी महाराज तसेच पूज्य तीर्थंकर ऋषीजी महाराज यांचे मंगल आगमन झाले. त्यांच्या आगमनानिमित्त नवी पेठ परिसरातील जैन समाज, जय आनंद महावीर युवक मंडळ आणि आनंद चालीसा ग्रुप यांच्या वतीने अत्यंत भक्तिमय वातावरणात भव्य स्वागत करण्यात आले.

यावेळी पूज्य उपाध्याय प्रवर श्री प्रवीण ऋषीजी महाराज यांनी आपल्या प्रभावी प्रवचनातून नवी पेठ जैन धर्मस्थानकाचा गौरवशाली इतिहास, येथील धार्मिक परंपरा आणि धर्मस्थानकाचे आध्यात्मिक महत्त्व याविषयी सखोल मार्गदर्शन केले. त्यांच्या ओजस्वी आणि प्रेरणादायी प्रवचनाचा लाभ घेण्यासाठी नगर शहरासह परिसरातील जैन समाजातील हजारो भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता.

कार्यक्रमात चातुर्मास समितीचे प्रमुख अशोक बाबुशेठ बोरा यांनी आपल्या मनोगतात नवी पेठ जैन धर्मस्थानकाच्या स्थापनेपासूनच्या अनेक ऐतिहासिक आणि प्रेरणादायी आठवणींना उजाळा दिला. धर्मस्थानकाच्या जडणघडणीत ज्येष्ठ समाजबांधवांनी केलेले योगदान, समाजातील एकोप्याची परंपरा आणि धार्मिक संस्कार जपण्याचे महत्त्व त्यांनी उपस्थितांसमोर मांडले. तसेच पूज्य श्री प्रवीण ऋषीजी महाराज यांच्या आगमनामुळे नवी पेठ परिसराला आध्यात्मिक ऊर्जा लाभली असून, अशा धार्मिक कार्यक्रमांमधून युवकांनी धर्म, संस्कार आणि समाजसेवेची प्रेरणा घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जय आनंद युवक मंडळ, आनंद चालीसा ग्रुप तसेच नवी पेठ परिसरातील युवक-युवती आणि नागरिकांनी विशेष परिश्रम घेतले. याबाबत माहिती देताना जय आनंद महावीर युवक मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत यांनी सांगितले की, पूज्य महाराजांच्या आगमनामुळे नवी पेठ परिसरात धार्मिक आणि आध्यात्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, भाविकांना त्यांच्या अमूल्य मार्गदर्शनाचा लाभ मिळाला आहे.

या प्रसंगी चातुर्मास समितीचे अशोक बाबुशेठ बोरा, मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत, वसंत लोढा, पारस लोढा, सुभाष भंडारी, ईश्वर बोरा, आनंद मुथा, सत्यन मुथा, सचिन डागा आदी मान्यवरांनी पूज्य महाराजांचे स्वागत केले.

कार्यक्रमात नेहा ओसवाल आणि पद्माताई गांधी यांनी भक्तिमय स्तवन सादर करून वातावरण अधिक मंगलमय केले. तसेच आनंद पाठशाळेतील विद्यार्थिनींनी आकर्षक लेझीम नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या शेवटी श्री जय आनंद महावीर युवक मंडळाच्या वतीने नवकारशीची व्यवस्था करण्यात आली.

या स्वागत सोहळ्यास जय आनंद महावीर युवक मंडळाचे पदाधिकारी, आनंद चालीसा ग्रुपचे सदस्य, जैन समाजातील मान्यवर तसेच हजारो भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अंतर्गत अहिल्यानगर सायबर वॉरियर्सच्या २० स्वयंसेवकांना विशेष प्रशिक्षण



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमांतर्गत अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर येथील संगणक विभागाच्या सहकार्याने अहमदनगर सायबर वॉरियर्सच्या २० स्वयंसेवकांसाठी विशेष प्रशिक्षण सत्राचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश स्वयंसेवकांना सायबर जनजागृती, व्यावसायिक कौशल्ये, व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्व क्षमता आणि त्यांच्या अंगी असलेल्या गुणांची ओळख करून देत भविष्यातील जबाबदाऱ्यांसाठी सक्षम बनविणे हा होता.

या प्रशिक्षणासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अभिजित कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. दिलीप भालसिंग, उपप्राचार्य विलास नाबडे, संगणक विभागाचे विभागप्रमुख रझ्झाक सर तसेच रोजगार समन्वयक निवेदिता काळे मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षित झालेले अहमदनगर सायबर वॉरियर्सचे हे २० स्वयंसेवक भविष्यात विविध सायबर जनजागृती उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणार आहेत.

या प्रसंगी क्विक हील फाउंडेशनतर्फे दीपू सिंह यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी केवळ सायबर सुरक्षेचे तांत्रिक प्रशिक्षणच दिले नाही, तर प्रत्येक स्वयंसेवकामधील वेगवेगळे गुण, कौशल्ये आणि नेतृत्व क्षमता ओळखण्यासाठीही विशेष प्रयत्न केले. संवादात्मक उपक्रम, गटचर्चा आणि प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून त्यांनी स्वयंसेवकांना स्वतःच्या क्षमतांची जाणीव करून देत त्यांचा प्रभावी विकास करण्यासाठी प्रेरित केले.

प्रशिक्षणामध्ये सहभागी झालेल्या २० स्वयंसेवकांनी उत्साहाने व शिस्तबद्ध पद्धतीने सहभाग नोंदविला. प्रशिक्षणादरम्यान त्यांनी सायबर सुरक्षेशी संबंधित विविध संकल्पना, प्रभावी संवाद कौशल्य, सांघिक कार्यपद्धती, नेतृत्वगुण आणि सामाजिक जबाबदारी यांसारख्या महत्त्वपूर्ण बाबी आत्मसात केल्या. या प्रशिक्षणामुळे प्रत्येक स्वयंसेवकाला स्वतःची क्षमता, कौशल्ये आणि वैशिष्ट्यपूर्ण गुण ओळखण्याची संधी मिळाली.

या प्रशिक्षणाच्या यशस्वी आयोजनाबद्दल अहमदनगर सायबर वॉरियर्सतर्फे अहमदनगर महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाचे, संगणक विभागातील सर्व प्राध्यापक व कर्मचारीवर्गाचे तसेच क्विक हील फाउंडेशनचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. प्रशिक्षणासाठी उपस्थित राहून मोलाचे मार्गदर्शन केल्याबद्दल दीपू सिंह यांचे विशेष आभार मानण्यात आले.

सायबर सुरक्षेबाबत समाजामध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी आणि प्रशिक्षित स्वयंसेवकांची प्रभावी फळी तयार करण्याच्या दृष्टीने हे प्रशिक्षण महत्त्वपूर्ण ठरले असून, आगामी काळात अहमदनगर सायबर वॉरियर्स विविध शैक्षणिक संस्था व सामाजिक स्तरावर सायबर सुरक्षा जनजागृती अभियान अधिक व्यापकपणे राबविणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

---

## वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठल सेवा!



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आषाढी वारीच्या पावन पर्वानिमित्त संत निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्याचे अहिल्यानगर येथे आगमन होताच अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने मार्केट यार्ड परिसरात भव्य वारकरी सेवा उपक्रम राबविण्यात आला. ‘‘वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठल सेवा‘‘ या भावनेतून सुमारे ८ ते ९ हजार वारकरी बांधवांना पिण्याचे थंड पाणी, राजगिरा लाडू, बिस्किटे तसेच अल्पोपहाराचे निस्वार्थ वाटप करण्यात आले.

या सेवाकार्यात राहुरी-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार अक्षय शिवाजीराव कर्डिले, महापौर ज्योतीताई गाडे, मार्केट कमिटीचे चेअरमन भाऊसाहेब बोठे तसेच संचालक मंडळातील सदस्यांनी उपस्थित राहून वारकऱ्यांची सेवा केली व स्वयंसेवकांचे मनापासून कौतुक केले.

उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मनोज सोनवणे, अशोक गाढे, संदीप नवसुपे, भरत सुंबे, सिद्धांत पानसरे, निलेश सुंबे, संतोष बेरड, संजय शिंदे, अनुराधा ताई येवले, सागर भोसले, शशिकांत भांबरे, गणेश नाईकनवरे, मयूर पवार, चि. मित गाढे, विलास तळेकर, सोमनाथ गुंड, मिलिंद जपे, महादेव कोतकर, संदीप जगताप, राम जरांगे, भरत भोसले, कु. शुभरा भोसले, अक्षय तोडमल, श्रीपाद दगडे, गजेंद्र दांगट, चि. रितेश सोनवणे, वैभव भोगडे, जगू निमसे तसेच सिव्हिल हॉस्पिटलच्या वैद्यकीय पथकाने अथक परिश्रम घेतले.

---

## ‘‘मतांसाठी आम्ही... आणि रोजगारासाठी कोण?’’ स्थानिक कचरा वेचकांनी मांडल्या व्यथा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** रामवाडी येथे आयोजित ‘‘कष्टकऱ्यांची चहावर चर्चा’’ या बैठकीत महिला व पुरुष कचरा वेचकांची विविध विषयावर चर्चा रंगली होती. यामध्ये शहरातील कचरा वेचक वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ही चर्चा बेंगळुरूमधील हसरू दला संस्थेच्या सहकार्याने प्रायोगिक तत्त्वावर (पायलट प्रकल्प) आयोजित करण्यात आली होती. यावेळी २० कचरा वेचकांना सुरक्षा साहित्य (सेफ्टी किट) वितरित करण्यात आले.

या उपक्रमातून कचरा वेचकांच्या सुरक्षिततेबरोबरच त्यांच्या हक्क, सन्मान आणि रोजगाराच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली. बैठकीत सुभद्राबाई उल्हारे, अलका उल्हारे आणि इतर कचरा वेचकांनी अनेक वर्षांपासून शहराची स्वच्छता राखण्यासाठी योगदान देऊनही रोजगाराची शाश्वती, सामाजिक सुरक्षा, ओळखपत्र, गणवेश, सुरक्षा साहित्य आणि सन्मान यांसारख्या मूलभूत सुविधांची आवश्यकता अधोरेखित केली.

स्थानिक कचरा वेचकांना रोजगाराच्या संधींमध्ये प्राधान्य मिळावे, जेणेकरून अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह सुरक्षित होईल, अशी एकमुखी मागणी करण्यात आली. ‘‘मतांसाठी आम्ही... आणि रोजगारासाठी कोण?’’ हा प्रश्न उपस्थित करत स्थानिक श्रमिकांना न्याय मिळावा, अशी भावना व्यक्त करण्यात आली.

चर्चेदरम्यान बेंगळुरूमधील हसरू दला संस्थेने कचरा वेचकांच्या संघटन, सुरक्षा आणि सक्षमीकरणासाठी राबविलेल्या उपक्रमांची माहिती देण्यात आली. पायलट प्रकल्पांतर्गत वितरित करण्यात आलेल्या २० सेफ्टी किटचा अनुभव सकारात्मक असून, भविष्यात अशा सुविधा अधिकाधिक कचरा वेचकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

यावेळी स्थानिक कचरा वेचकांना रोजगारात प्राधान्य, ओळखपत्र, गणवेश, सुरक्षा साहित्य, आरोग्य विमा, सामाजिक सुरक्षा योजना आणि नियमित उपजीविकेची हमी यासाठी संबंधित यंत्रणांकडे सातत्याने पाठपुरावा करण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीच्या शेवटी कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत यांच्या नेतृत्वाखाली कचरा वेचकांना अधिक संघटित करून त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी लोकशाही मार्गाने पुढील भूमिका निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती संघटनेचे जिल्हा समन्वयक विकास उडाणशिवे यांनी माहिती दिली.

---

## जय हिंद फाऊंडेशनचे खंडोबावाडी गडावर ६५ वडांच्या वृक्षांची लागवड


**खंडोबा मंदिर परिसर होणार हिरवाईने समृद्ध; ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत भविष्यातील पिढ्यांसाठी हिरवाईचा ठेवा निर्माण करण्याच्या उद्देशाने जय हिंद फाऊंडेशनच्या वतीने पाथर्डी तालुक्यातील करंजी येथील खंडोबावाडी परिसरात वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले. खंडोबा मंदिर गड परिसरात तब्बल ६५ वडांच्या झाडांची लागवड करून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला. फाऊंडेशनचे शिवाजी पालवे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम पार पडला.

या वृक्षारोपण कार्यक्रमास पाथर्डी तालुका पत्रकार संघाचे विलास मुखेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून अभियानाची सुरुवात करण्यात आली. यावेळी जय हिंद फाऊंडेशनचे शिवाजी पालवे, भाऊसाहेब पालवे, संदीप पालवे, कृष्णा काकडे, ग्रामपंचायत सदस्य अंबादास नजन, अर्जुन भिटे, कृष्णा नजन, विजय भांड, सुनील नजन, बंटी हजारे, खंडू दुतारे, मुरलीधर आगासे, प्रवीण आगासे, साहेबराव दुतारे, रवी नगरे, रामा भिटे, माऊली हजारे, योगेश हजारे, सार्थक भिटे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना शिवाजी पालवे म्हणाले की, गेल्या काही वर्षांपासून हवामानात मोठ्या प्रमाणावर बदल होत असून याचा फटका शेतीसह सर्वसामान्य जनतेला बसत



आहे. पावसाळ्याचे दोन महिने उलटत आले असतानाही राज्यातील अनेक भागांत समाधानकारक पाऊस झालेला नाही. मोठ्या प्रमाणावर होत असलेली वृक्षतोड, वाढते प्रदूषण आणि पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास ही परिस्थिती निर्माण होण्यामागील प्रमुख कारणे आहेत. त्यामुळे प्रत्येकाने वृक्ष लागवड करणे आणि त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे त्यांचे संगोपन करणे ही काळाची गरज आहे. झाडे हीच भविष्यातील पावसाची, पर्यावरण संतुलनाची आणि मानवी जीवनाची खरी शिदोरी असल्याचे सांगत त्यांनी शेतकऱ्यांनी झाडांची कत्तल न करता त्यांचे संरक्षण करण्याचे आवाहन केले.
विलास मुखेकर म्हणाले की, पर्यावरणाचे रक्षण करणे ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे सामाजिक कर्तव्य आहे. जय हिंद फाऊंडेशनने राबविलेला हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी असून केवळ वृक्षारोपण न करता त्यांचे संगोपन करण्यावरही भर दिला पाहिजे.

# तिरुपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ बोरा यांची जैन ओसवाल पतसंस्थेस सदिच्छा भेट

## जैन ओसवाल पतसंस्थेची प्रगती कौतुकास्पद – सौरभ बोरा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्व.सुवालालजी गुंदेचा यांनी जैन ओसवाल पतसंस्थेचे लावलेले रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झालेले दिसत आहे.समाजासाठी तसेच समाजातील व्यावसायिकांना आर्थिक मदत करून प्रोत्साहन देण्यासाठी सुरू झालेली ही पतसंस्था आज नावारूपाला आली आहे.जैन ओसवाल पतसंस्थेची प्रगती कौतुकास्पद आहे.उपाध्याय श्री प्रवीण ऋषीजी म.सा.यांचा समर्पण चातुर्मास हा भव्य दिव्य होण्यासाठी प्रत्येकाने या धार्मिक कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग घ्यावा.असे आवाहन तिरुपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ बोरा यांनी केले आहे.

जैन ओसवाल नागरी सह. पतसंस्थेस तिरुपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ बोरा यांनी सदिच्छा भेट देऊन पतसंस्थेच्या स्वमालकीची इमारत पाहून समाधान व्यक्त केले.तसेच यावेळी मर्चंट बँकेचे माजी संचालक व संस्थेचे सभासद अशोक पितळे यांचा वाढदिवसानिमित्त व सौरभ बोरा यांचा विशेष सत्कार करण्यात आला.याप्रसंगी जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन अभय पितळे,व्हाईस चेअरमन शैलेश गांधी,संचालक संतोष गांधी, मनोज गुंदेचा,समीर बोरा,चेतन भंडारी,विनीत बोरा,अँड.आनंद फिरोदिया,शरद गोयल, शांतीलाल गुगळे,परेश बोरा, आदींसह पतसंस्थेचे माजी चेअरमन शैलेश मुनोत,प्रकाश रामलालजी गांधी,नितीन चंगेडे,प्रमोद डागा, प्रतीक बोगावत, प्रशांत गांधी ,आनंद मुथ्था, सुधीर मुनोत,बाबालाल गांधी, सचिन डुंगरवाल,प्रशांत गवळी, संतोष पिपाडा,संजय ताथेड, नितीन मुनोत,गणेश गवळी, सुनील लोढा आदी उपस्थित होते.

अशोक पितळे म्हणाले,सौरभ बोरा यांनी वडिलांचा पारंपारिक व्यवसाय न करता मुंबई येथे जाऊन मोठ्या जिद्दीने वीस वर्षात मोठी प्रगती केली आहे. सौरभ बोरा यांचे जागतिक स्तरावर उद्योजक म्हणून चांगला नवलौकिक आहे. तरीदेखील नगरच्या मातीशी असलेले घटना नाते त्यांनी तुटू दिले नाही.आजही नगरची नाळ त्यांची जोडलेली आहे. शहराच्या धार्मिक सामाजिक तसेच सांस्कृतिक कार्यात त्यांचा नेहमीच सहयोग मिळत आहे. नगर शहरात होणाऱ्या समर्पण चातुर्मास या कार्यक्रमासाठी सौरभ बोरा यांनी सिंहाचा वाटा उचलला आहे.सौरभ बोरा हे एक आदर्श व्यक्ती म्हणून तरुणांसाठी नेहमीच मार्गदर्शक असे ठरणार आहेत.त्यांनी समाजातील युवकांना मार्गदर्शन करावे.

व्हाईस चेअरमन शैलेश गांधी म्हणाले,सौरभ बोरा यांनी जैन औसवाल पतसंस्थेला सदिच्छा भेट दिल्याने सर्व संचालक मंडळाचा उत्साह वाढला आहे. सर्व संचालक मंडळाला अशोक पितळे यांचे मार्गदर्शन लाभत असते.येणाऱ्या काळात पतसंस्था दोनशे ते तीनशे कोटीचा टप्पा पार करेल.

संतोष गांधी प्रास्ताविकात म्हणाले,संस्थेचे सभासद अशोक पितळे यांचे जैन ओसवाल पतसंस्थेला नेहमीच अनमोल असे मार्गदर्शन लाभत असते.तसेच उद्योजक सौरभ बोरा यांनी केलेले प्रगती पाहून संस्थेचे सभासद असल्याचा सर्वांना अभिमान वाटतो.

# वारकऱ्यांची सेवा हीच पांडुरंगाची सेवा - ह.भ.प. मदन महाराज वर्पे

## आयएमए महिला विंग कडून ४०० वारकऱ्यांची आरोग्य तपासणी । महिला–पुरुष वारकऱ्यांवर मोफत उपचार, औषधे व आवश्यक साहित्याचे वाटप





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** वारकऱ्यांची सेवा हीच खरी पांडुरंगाची सेवा असून वारकऱ्यांच्या चरणीच विठ्ठलाचे दर्शन घडते. शेकडो किलोमीटर पायी चालत विठ्ठलाच्या भेटीस निघालेल्या वारकऱ्यांची निस्वार्थ सेवा करणे हीच खरी ईश्वरसेवा आहे, असे प्रतिपादन ह.भ.प. मदन महाराज वर्पे यांनी केले.

संतश्रेष्ठ सद्गुरु श्री निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळा (श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर ते श्रीक्षेत्र पंढरपूर) अंतर्गत संतशिरोमणी भागवत बाबा पायी दिंडी अहिल्यानगर येथे दाखल झाली असता इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) महिला डॉक्टर विंगच्या वतीने महिला व पुरुष वारकऱ्यांसाठी विशेष मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या सेवाभावी उपक्रमाला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शिबिरामध्ये एकूण ३५० ते ४०० महिला व पुरुष वारकऱ्यांची आरोग्य तपासणी करून आवश्यक औषधोपचार करण्यात आले. त्यामध्ये १०२ वारकऱ्यांची रक्तातील साखर (ब्लड शुगर) तपासण्यात आली, तर ९८ वारकऱ्यांची हिमोग्लोबिन (एचबी) चाचणी करण्यात आली. याशिवाय रक्तदाब तपासणी, सर्वसाधारण वैद्यकीय तपासणी व विविध आजारांवरील उपचार करण्यात आले.

वारकऱ्यांना रक्तवाढीच्या गोळ्या, कॅल्शियम, वेदनाशामक औषधे, वेदनाशामक मलम, अँटीफंगल क्रीम, अँटी- ॲलर्जीक व अँटीस्पास्मोडिक औषधे, युटिलिटी किट तसेच शेंगदाणा चिक्कीचे वाटप करण्यात आले.पायी वारी करणाऱ्या वारकऱ्यांच्या आरोग्याच्या गरजा लक्षात घेऊन आवश्यक वैद्यकीय सल्लाही देण्यात आला.

आयएमए महिला डॉक्टर विंगच्या नव्या कार्यकारिणीच्या सेवाभावी उपक्रमाची सुरुवात या आरोग्य शिबिरातून करण्यात आली. विठू माऊलीच्या कृपेने वारकऱ्यांची सेवा करण्याची संधी लाभणे, हे आमच्यासाठी मोठे भाग्य असल्याची भावना महिला डॉक्टरांनी व्यक्त केली.

शिबिराचे आयोजन डॉ. मंजिरी झेंडे, डॉ. क्रांती खालकर व डॉ. सुजाता नरवडे यांनी केले. यावेळी डॉ. रेखा सानप, डॉ. दिपाली फाळके, डॉ. प्राजक्ता पारधे, डॉ. रेशमा चेडे, डॉ. मेघना पाटणकर, डॉ. डी. पी. अग्रवाल, डॉ. श्वेता फाळके डॉ. कांचन रच्चा व सुधीर लांडगे यांनी मोलाचे सहकार्य केले. आयएमएच्या सर्व डॉक्टरांनी औषधांची उपलब्धता करून देत उपक्रम यशस्वी केला.

वारकऱ्यांचा साधेपणा, भक्तिभाव आणि निस्वार्थ वृत्ती हीच खरी पूजा असून, वारकऱ्यांची सेवा म्हणजे विठ्ठलाच्या चरणी अर्पण केलेली भक्ती असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# तिसऱ्या नरेंद्रजी फिरोदिया चषक अखिल भारतीय क्लासिकल आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शुक्रवार १७ जुलै रोजी अहिल्यानगर च्या , लक्ष्मी नारायण मंगल कार्यालय, एसटी स्टँड रोड येथे तीसरी नरेंद्रजी फिरोदिया चषक अखिल भारतीय सतराशे पेक्षा कमी मानांकित खेळाडूंसाठी बुद्धिबळ स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. अशी माहिती अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे उपाअध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी यांनी दिली. या स्पर्धेत भारतातून खेळाडू बुद्धिबळ खेळण्यासाठी येणार असून आत्तापर्यंत गुजरात, आंध्र प्रदेश, गोवा, तमिळनाडू, तेलंगाना इत्यादी राज्यातून तीनशे



च्या वर खेळाडूंनी आपला प्रवेश निश्चित केला आहे. लौकरच येणारा आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ दिवस तसेच गुरुपौर्णिमा याचे औचित्य साधून वरील स्पर्धा आयोजित केली आहे. नरेंद्र फिरोदिया यांनी आजपर्यंत बुद्धिबळा साठी दिलेल्या योगदानाला वंदन म्हणून त्यांच्या नावाची ही तीसऱ्यांदा स्पर्धा आयोजित होत आहे असे अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनी सांगितले.

साडेचार वर्षाचा बाळ खेळाडू तसेच ८३ वर्षाचे वयस्कर खेळाडू सुद्धा यात आपल्या बुद्धीचे बळ पणाला लावणार आहेत.

शुक्रवारी १७ जुलै रोजी सकाळी १०.०० वाजता ह्या स्पर्धेचे शुभारंभ होणार असून. त्यानंतर स्पर्धा सुरू होणार आहे या स्पर्धेत एकूण ९ फेऱ्या होणार आहेत. रविवारी दुपारी ४.००वा तिसऱ्या नरेंद्र फिरोदिया चषक बुद्धिबळ स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ होणार आहे.

या स्पर्धेत विविध गटात पाच लाख रुपयांची प्रोत्साहन पर रोख बक्षिसे, आकर्षक ७० करंडक व सर्व खेळाडूंना सहभाग प्रमाणपत्र सुद्धा देण्यात येणार आहेत.

या स्पर्धेचे प्रमुख पंच प्रवीण ठाकरे (जळगाव) हे असून त्यांना पवन राठी (पुणे),शार्दुल टापसे (सातारा),दीपक चव्हाण (वाशिम), शिशिर इंदुरकर ( नागपूर), प्रशांत घगेकर, देवेंद्र ढोकळे (नगर)आदी सहाय्यक पंच म्हणून जबाबदारी पार पाडणार आहेत. ही स्पर्धा जागतिक बुद्धिबळ संघटनेच्या नियम नियमावली नुसार होणार आहे.

या स्पर्धेचे प्रमुख आकर्षण आंतरराष्ट्रीय दर्ज्याचे १०० लाकडी पट व सोगट्या हे राहणार आहे. १०० आंतरराष्ट्रीय दर्जाचे लाकडी पटांचा वापर भारत पहिल्यांदा होणार आहे. अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे सदस्य सुबोध ठोंबरे, परूनाथ ढोकळे, शाम कांबळे, मनीष जसवानी, प्रकाश गुजराती, चेतन कड, सचिन कांबळे (पाथर्डी), शिवा काळे (श्रीरामपूर), कु दुर्गा ढोकळे (शेवगाव), संकेत गाडे (कोपरगाव), संजय खडके, नवनीत कोठारी, दत्ता घाडगे, अतुल कोठारी,सौ शुभदा ठोंबरे,डॉ. स्मिता वाघ, सौ. रोहिणी आडकर आदी स्पर्धा यशस्वी होण्यासाठी प्रयत्नशील आहेत. अहिल्यानगर शहरातील बुद्धिबळ चाहत्यांनी, खेळाडूंनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच वरील स्पर्धेत भाग घेण्यासाठी व अधिक माहितीसाठी व नोंदणीसाठी संपर्क यशवंत बापट. ९३२६०९२५०१ व पारूनाथ ढोकळे ९८५०७०४२६८.

# पावसाने घेतला ब्रेक; पैठण तालुक्यात खरीप संकटात, शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे!

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** पावसाळ्याच्या सुरुवातीला झालेल्या समाधानकारक पावसानंतर अचानक पावसाने खंड पडल्याने पैठण तालुक्यातील खरीप पिकांवर संकटाची छाया गडद झाली आहे. सोयाबीन, कापूस, बाजरी, मूग, उडीद आदी पिकांची वाढ खुंटू लागली असून शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे.

तालुक्यातील आडूळ, पाचोड, लोहगाव, बालानगर, पारुंडी, खामगाव, बिडकीन, पिंपळवाडी, घारी, दादेगाव, पाटेगाव, चनकवाडीसह अनेक गावांमध्ये खरीप पिकांच्या पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. शेतकऱ्यांनी बियाणे, रासायनिक खते व कीटकनाशकांवर मोठा खर्च करून पेरण्या केल्या; मात्र पावसाने अचानक पाठ फिरवल्याने जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत आहे.

ओलाव्याअभावी पिकांची वाढ मंदावली असून अनेक ठिकाणी रोपे पिवळी पडण्यास सुरुवात झाली आहे. दुसरीकडे शेतात तण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. खुरपणीसाठी मजूर मिळत नसल्याने शेतकऱ्यांचा खर्च वाढत असून दुहेरी संकटाचा सामना करावा लागत आहे.

सध्या तालुक्यातील बहुतांश शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसले आहेत. येत्या काही दिवसांत दमदार पाऊस झाला नाही, तर खरीप हंगामावर मोठे संकट ओढवण्याची भीती व्यक्त केली जात आहे. कृषी तज्ज्ञांनी पाऊस पडताच तातडीने आंतरमशागत, तणनियंत्रण आणि आवश्यक पीक व्यवस्थापनाची कामे करण्याचा सल्ला दिला आहे.

(पान १ वरून)

## एलसीबी गुन्हे डिटेक्शनमध्ये बॅकफुटवर

बाहेरचा रस्ता दाखविला आहे. मात्र तेथे तुर्त नव्याने कोणालाही संधी देण्यात आली नाही. त्यामुळे अनेकजण येथे नियुक्तीसाठी गुडघ्याला बाशीग बांधून बसले आहेत.

सगळेच गुन्हे सायबर सेलमार्फत उघड होत नाही

सगळेचत गुन्हे हे साबर सेलमार्फत उघड होत नसून त्याला जनसंपर्कही महत्वाचा आहे. येथील कर्मचाऱ्यांना कार्यकाळ पाहिल्यास अनेकांचा जनसंपर्क कमी असल्याचे दिसून येत असल्याने हा विभागा गुन्हे उघडकीस आणण्यात अपयशी ठरत आहे.तसेच या विभागात आणखी काही कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या जाणार असल्याचे सांगण्यात येत असले तरी या नियुक्त्यांवरही अनेकांचे बारीक लक्ष राहणार आहे. त्यामुळे भविष्यात येथील नियुक्या ह्या वादाच्या भोवऱ्यात सापडू नये एवढीच अपेक्षा आहे.

**गुन्हे प्रलंबीत असल्याने या विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह**

नुकतेच श्रीरामपुरमध्ये युवा उद्योजक आकाश दुबय्या याच्यावर गोळीबार होऊन मृत्यूमुखी पडल्याने येथील वातावरण तणावग्रस्त आहे. येथे स्वतः पालकमंत्र्यांना हस्तक्षेप करावा लागला आहे. मात्र तब्बल ४८ तास उलटूनही एलसीबीला आरोपींपर्यंत पोहचता आले नाही त्यामुळे श्रीरामपुर बंदची हाक देण्यात आली आहे. तसेच संगमनेर तालुक्यात एका अल्पवयीन मुलीवर ॲसीड हल्ला झाला मात्र त्याही गुन्ह्यातील आरोपींना पकडण्यात एलसीबीला पुर्णतः यश आले नसून माजी महापौर अभिषेक कळमर हा तर सराईत गुन्हेगारासारखा पोलिसांना मिळू नये ही मोठी एलसबीसाठी शरमेची बाब आहे. तसेच भाजपने तर गेल्या काही दिवसांपुर्वी ड्रग्ज विरोधात थेट पोलिस अधीक्षांच्या कार्यालयाबाहेरच विनापरवाना आंदोलन केले. मात्र त्याही नंतर ड्रग्ज माफियांपार्यंत एलसीबी पोहचु शकली नाही.

एलसीबीतील प्रभारी अधिकाऱ्यांसह

जिल्ह्यातील बदल्यांमध्ये मोठी उलाढाल

एलसबीमधील प्रभारी अधिकाऱ्याच्या नियुक्तीसह जिल्ह्यातील अधिकाऱ्यांच्या जिल्हांतर्गद बदल्यांमध्ये मोठी उलाढाल झाल्याची जोरदार चर्चा आहे. या सर्व प्रक्रीयेबाबत वरिष्ठस्तरावरुन आढावा घेतला जात आहे. त्यामुळे या नियुक्त्याही भविष्यात वादाच्या भोवऱ्यात सापडू शकतात.

## शहरातील वातावरण दूषित करण्याचा आयुक्तांचा प्रयत्न

जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मनपा आयुक्त श्री. यशवंत डांगे यांनी अचानक दिनांक १३ जुलै रोजी एका वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द केली व त्यात रस्त्यात अडथळा असणा-या मंदीर, मशीद, दर्गा, गुरुद्वारा आदींना सुचित केले की ७ दिवसांच्या आत अशा धार्मिक स्थळांचा अधिकृत असल्याचा दाखला किंवा कागदपत्र सादर करावे, अन्यथा महापालिकेतर्फे सदर धार्मिक वास्तू निष्कासीत किंवा जमीनदोस्त करण्याच्या सज्जड बेकायदेशीर इशारा दिला आहे. परंतु जाणूनबुजून विकासाच्या नावाने जातीय तणाव निर्माण करण्याचा तसेच

धार्मिक उद्रेक करण्याकरिता आयुक्तांनी ही नोटीस प्रसिध्द केली असून, वास्तविक महापालिका हद्दीत ओपन स्पेस, मोठमोठे नाले गायब झाले.

दिल्लीगेटचे गाळे पाडून सुमारे १५ वर्षे झाली, नेहरु मार्केट अद्याप खड्ड्यात आहे. तसेच शहरात एसआयआरचे काम युध्द पातळीवर सुरु असतांना कोणाच्या तरी सांगण्यावरून मनपा आयुक्तांनी सदर नोटीस देऊन शहरातीलप वातावरण दूषित करण्याचा प्रयत्न केला आहे, असे निवेदनात म्टले आहे.

## स्वखर्चाने राज चेंबर्सचा कायापालट विघ्नसंतोषी लोकांना सहन होईना

व्यावसायिकांनी दिले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून येथे दुर्गधीयुक्त कचरा होता. त्याचा सर्वच व्यावसायिकांना त्रास सहन करावा लागत होता. याचा गैरफायदा घेऊन अनेक गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक येथे आश्रय घेऊन गुन्हेगारीला खतपाणी घाण्याचे काम करत होते. या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींविरोधात

व्यावसायिकही धाडस करत नव्हते. मात्र बाबासाहेब सानप यांनी खंबीर भूमिका घेतल्याने येथील दुर्गधीयुक्त कचरा काढून तेथे अत्यंत चांगल्या प्रकारे स्वच्छता करण्यात आली आहे. तसेच येथे गेट बसविण्यात आले असून एक सुरक्षारक्षकाचीही नेमणूक करण्यात आली आहे. त्यामुळे येथे चोऱ्या होण्याचीही भीती राहिली नाही. तसेच ज्या व्यावसायिकांना आपल्या दुकानात यायचे आहे, ते सुरक्षारक्षकाला सांगून येथे प्रवेश करतात. त्यामुळे येथे कोणाची अडवणूक होण्याचा प्रश्नच उदभवत नाही, असेही व्यावसायिकांनी स्पष्ट केले आहे.

## श्रीक्षेत्र भगवानगड पायी दिंडी सोहळ्याचे खरवंडी कासार येथे स्वागत

पारगांव, सिद्धेश्वर संस्थान शिरुर कासार, मायंबा संस्थान भालगांव, भगवानबाबा संस्थान छत्रपती संभाजीनगर–पैठण–आळंदी, कानिफनाथ संस्थान खडकवाडी, केशवराज संस्थान वारणी,निरंजन संस्थान एकनाथवाडी, सुदर्शन गड संस्थान पाटणसांगवी, जय हनुमान संस्थान राणेगांव, दुर्गाशक्तीगड भिलवाडे, कानिफनाथ संस्थान खर्डा, हनुमान टाकळी संस्थान, शहर टाकळी संस्थान, कानिफनाथ संस्थान खोकरमोह, सालसिद्धेश्वर संस्थान मिडसांगवी, संत भगवानबाबा संस्थान तागडगांव इत्यादी संस्थानांचा समावेश होतो. खरवंडी कासार येथे पालखी रथ आगमन प्रसंगी भगवान विद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थीनी कर्मचारी ग्रामस्थ यांनी स्वागत केले खरवंडी कासार सेवा सोसायटी व्हा.चेअरमन दिपक पाटील सरपंच प्रदिप पाटील माजी उपसरपंच शरद दहिफळे माजी शालेय व्यवस्थापण अध्यक्ष पंढरीनाथ ( पप्पु) केकाण अजिनाथ जायभाये मयुर जायभाये सेवा मुंगूसवाडे सोसायटी सचिव दिलीप जगताप पत्रकार सतिश जगताप विवेक अंदुरे माणिक अंदुरे पाटील महादेव खेडकर किशोर कुलकर्णी माजी उपसरपंच राजेंद्र जगताप डॉ. संदिप कराड डॉ. ज्ञानेश्वर दराडे मालेवाडी सरपंच सुनिल खेडकर आदी खरवंडी कासार ग्रामस्थांनी पालखी रथाचे स्वागत केले .

## सुजय विखेंनी दुध भेसळखोरांना चिथावणी देऊ नये - ॲड. लगड

अधिकाऱ्याला जनतेने त्यांच्या चांगल्या कामाने डोक्यावर घेतलेले असताना चुकीचे पध्दतीने कार्यक्षम अधिकाऱ्याला दोष देणे उचीत नाही. तुकाराम मुंढे यांनी कोणत्या अधिकाऱ्यावर दबाव टाकून खोटे पंचनामे करण्यास सांगितले? याचा सविस्तर खुलासा करावा.तस असेल तर तुम्ही माननीय मुख्य मंत्री महोदय यांच्या कडे रितसर तक्रार करावी. आपण तर भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष आहात. एवढच नव्हे तर आपण भाजपचे माजी खासदार आहात. आपण शिक्षीत आहात. आपण विचारपुर्वक बोलले पाहिजे. आपले संपूर्ण कुटुंब भारतीय जनता पक्षाचे सर्वेसर्वा आहेत. आपले पिताश्री देखील कॅबिनेट मंत्री व जिल्हयाचे पालकमंत्री आहे. उलट दुध उत्पादक शेतकऱ्यांना जादा दर कसा मिळेल यासाठी प्रयत्न केले तर आपणास सर्व दुध उत्पादक धन्यवाद देतील असेही ॲड. सुरेश लगड यांनी म्हटले आहे

## शिर्डीतील १२ नंबर चारी वादावर डॉ. सुजय विखेंचा चुटकीसरशी यशस्वी तोडगा

त्यामुळे कोणावरही अन्याय होता कामा नये कोणाचेही नुकसान न होता सामंजस्याने मार्ग काढला जाईल तुम्ही सर्वजण कोणताही वाद न होता एकत्र एकोप्याने रहावे हीच ना राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह माझी व विखे परिवाराची इच्छा असून आजच यावर योग्य तो तोडगा काढू आणि चारीचा प्रश्न मार्गी लावू असे आश्वासन दिल्याने उपस्थित सर्वांनी टाळ्यांच्या कडकडाटात निर्णयाचे स्वागत केले.

गेल्या काही दिवसांपासून अगदी प्रतिष्ठेचा आणि टोकाचा वाद निर्माण होण्यापर्यंत गेलेला १२ नंबर चारीचा प्रश्न डॉ सुजय विखे पाटील यांनी अगदी सफाईदारपणे हाताळत दोन्ही गटांना दिलासा दिला आणि तरुण ,ज्येष्ठ ,महिला भगिनी आणि नगरपरिषदेचे अधिकारी,नगरसेवक यांना सर्वांना सामावून घेत निर्माण झालेल्या वादाला चुटकीसरशी कसे सोडवावे आणि त्यासाठी एक परिपक्व राजकीय भूमिका कशी असावी याचे मूर्तिमंत उदाहरण डॉ सुजय विखे पाटील यांनी दाखवून दिले.

## वीर हनुमान वारकरी सेवाभावी प्रतिष्ठानच्या अहिल्यानगर ते पंढरपुर पायी दिंडीचे प्रस्थान

दिंडी गेल्या अनेक वर्षापासूनची परंपरा आहे. ही दिंडी शिस्तबद्द होत असून, प्रत्येक वारकर्याची विशेष काळजी घेण्यात येत असते. नगर ते पंढरपुर हा १३ दिवसांचा प्रवास आहे. या दरम्यान वारकर्यांची ठिकठिकाणी नाष्टा,जेवण व राहण्याची व्यवस्था केली गेली आहे. यासाठी अनेकांचे सहकार्य लाभले असून, प्रत्येकाने आपआपली जबाबदारी स्विकारली आहे. पंढरपूरच्या पांडुरंगाच्या दर्शनाची आस लागली आहे. या दिंडीच्या माध्यमातून पुर्ण होत आहे. धार्मिक कार्यक्रम व चांगल्या नियोजनामुळे या दिंडीची दिवसेंदिवस प्रचिती वाढत आहे. पंढरपुर येथेही दर्शनाची व्यवस्था केली असल्याचे जाधव यांनी सांगितले.

प्रारंभी मार्केट यार्ड येथील हनुमान मंदिरात अध्यक्ष दत्ता जाधव व सुवर्णा जाधव यांच्याहस्ते पादुकांची पुजा करण्यात आली. या दिंडीत भगवे पताका घेतलेले युवक, डोक्यावर तुळशी वृंदावन घेतलेल्या महिला विठ्ठल..विठ्ठला..हरिओम विठ्ठला... दिंडी चालली पंढरपुरा... चा जय घोष करत होत्या. श्रीराम भक्त सत्संग सेवा मंडळ, श्रीराम मंदिर नवीपेठ यांचे पदाधिकारी आदी सहभागी होते.